*International Journal of Commerce and Management Studies (IJCAMS)*
*Peer Reviewed, Indexed Journal, ISSN 2456-3684*
*Vol.8, No.1, 2023, www.ijcams.com*

# अमरावती जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनांचे चिकित्सक अध्ययन कालखंड २०१४-१५ ते २०१९-२०

**प्रसन्न स. देशमुख**
**सहाय्यक प्राध्यापक**
**फुलसिंग नाईक महाविद्यालय, पुसद**

**डॉ. अरुण गो. हरणे**
**प्राध्यापक**
**श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती**

**सारांश :**

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने अमरावती जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या कृषीयोजनांच चिकित्सक अध्ययन २०१४-१५ ते २०१९-२० हा विषय घेऊन प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना लाभ शोधणे व योजनांची उपयोगिता व वैशिष्ट्य जाणून घेणे हे त्यांचे उद्दिष्ट होते. संशोधन पद्धती महाराष्ट्र सरकारचे जर्नल्स, इतर प्रकाशने, मासिके इ. हा डेटा होता हे संशोधन वर्णनात्मक अभ्यास आहे. विविध वेबसाइट्सवरून आवश्यक दुय्यम डेटा गोळा केला गेला ज्यात नंतर विश्लेषण आणि निष्कर्षापर्यंत पोहोचण्यासाठी पुनरावलोकन केले गेले. यावरून असे लक्षात येते की, सरकार आपल्या योजनेमार्फत शेतकऱ्यांना लाभ देण्यासाठी प्रयत्नशील आहे. परंतु योजनेचा लाभ सर्व शेतकऱ्यांना मिळत नाही. यासाठी मोठ्या प्रमाणात सरकारला त्यांच्या योजनांमध्ये बदल करून जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत योजनेचा लाभ किंवा माहिती पोहोचविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे हा निष्कर्ष निघाला.

**१. प्रस्तावना :**

कृषी क्षेत्राचे भारतीय अर्थव्यवस्थेतील महत्त्व लक्षात घेता स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शेती क्षेत्रात गुंतवणुकीस प्रोत्साहन देऊन त्यात वाढ केलेली दिसून येते. कृषी क्षेत्र ही सर्व उद्योगाची जननी आहे. तसेच मानवी पोषक जीवनासाठी,

प्रगती तसेच समृद्धीचे प्रतीक समजले जाते. भारतासारख्या कृषी प्रधान अर्थव्यवस्थेत राष्ट्रीय उत्पन्नाचे प्रमुख साधन, रोजगार, औद्योगिक विकास तसेच व्यापाराचे साधन म्हणूनही कृषी कडे पाहिले जाते. कोणतेही राष्ट्राचा आर्थिक विकास साधायचा असेल त्याच प्रथम कृषी व कृषी आधारित उद्योगांचा विकास करावा लागतो. कारण कृषी क्षेत्र हे सर्व उद्योगांचा पाया समजला जातो.

आजच्या काळातही कृषी क्षेत्र जगातील सर्वाधिक लोकसंख्येचे उपजीविकेचे साधन असल्याचे आढळून येते. जगातील सर्व विकसित राष्ट्रांनी प्रथम कृषीचा विकास करून नंतर औद्योगिक विकास केलेला आहे. त्यात रशिया, जर्मनी, इंग्लंड तसेच जपान यांच्या विकासात कृषीचे मोठे योगदान आहे. कृषी क्षेत्राचा सकल राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा जरी कमी असला तरीही शेतीचे आर्थिक विकासातील महत्त्व अनन्यसाधारण आहे. आज सकल राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचा वाटा 22 टक्के असला तरी शेतीवरील आधारित लोकसंख्येच्या त्या प्रमाणात घट झालेली नाही. आजही 65 टक्के लोकांचे उदरनिर्वाहाचे साधन शेती हे आहे. भारत लोकसंख्येच्या बाबतीत जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे. वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याची गरज भागविण्यासाठी व अन्नसुरक्षेसाठी कमी होणारे वहीतीखालील क्षेत्र व पाण्याचा तुटवडा या प्रमुख आव्हानांच्या बाबतीत विचार करायला हवा.

भारताला कृषी क्षेत्र विकासाचा दर गाठण्यासाठी शेती क्षेत्रात उत्पन्न वाढविण्याच्या खूप मोठ्या संधी उपलब्ध आहेत. कृषी प्रक्रिया, पूरक व्यवसाय, प्रक्रिया उद्योगांसाठी अनेक योजना केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्यामार्फत राबविण्यात येत आहे. यावर केंद्र सरकार व राज्य सरकार विविध योजनांच्या मार्फत मोठ्या प्रमाणात निधी खर्च करीत आहेत. सरकारी कृषी योजनांमुळे कृषी क्षेत्रात झालेली प्रगती, योजनांवर लाभ मिळालेले लाभार्थी, उत्पन्नात झालेला बदल, शासनाचे नवनवीन झालेले बदल या संदर्भात विविध लेख व संशोधन करून संशोधकांनी आपले मत

मांडले आहे. असे असले तरीही सदर संशोधन कृषी क्षेत्रातील प्रगतीवर भर टाकणारे नक्कीच असणार आहे.

केंद्र तसेच राज्य शासनाकडून शेतीच्या विकासासाठी भरपूर योजना राबविल्या जातात. तसेच मोठ्या प्रमाणात खर्चाची तरतूद ही केली जाते पण प्रत्यक्षात तरतूद केलेला खर्च पूर्ण केला जातो का? या योजनांची शेतकऱ्याला कितपत माहिती आहे. या योजनेचा लाभ प्रत्यक्षात लाभार्थी शेतकऱ्यापर्यंत कितपत होतो. तसेच लाभ घेताना येणाऱ्या अडचणी यांचा सखोल अभ्यास सदर संशोधनात केला जाणार आहे. विषयाची उपरोक्त महत्व लक्षात येता संशोधनासाठी खालील योजना निवडली आहे.

**I) प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना :**

केंद्र शासनाच्या महत्वाकांक्षी योजनेमध्ये सन 2015-16 पासून 'प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना' या समाविष्ट केली आहे प्रत्येक शेतकऱ्यांच्या . शेतास पाण्याची उपलब्धता करणे आणि पाण्याची कार्यक्षमता वाढवून पाण्याच्या प्रत्येक थेंबातून जास्तीत जास्त पीक उत्पादन मिळवने (more crop per drop) हा या योजनेचा उद्देश आहे.

**2. संशोधनाची उद्दिष्टे :**

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली.

१. अमरावती जिल्ह्यातील शेतकरी प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेमुळे झालेला लाभ शोधणे.

२. अशा योजनांची उपयोगिता वैशिष्ट्ये जाणून घेणे.

**३. संशोधनाचे गृहीतकृत्ये :**

सदर अध्ययनाची पुढील गृहितके मांडली आहे.

अमरावती जिल्ह्यातील कृषी व कृषकाची सद्यस्थितीतील पार्श्वभूमी लक्षात घेता कृषीविषयक सरकार योजनांची यशस्वीता ही शेतकऱ्यांची आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारण्याबाबत अजून

पर्यंत पुरेशा प्रमाणात दृष्टिकोचर आढळत नाही.

**४. संशोधन पद्धती :**


महाराष्ट्र सरकारचे जर्नल्स, इतर प्रकाशने, मासिके इ. हा डेटा होता हे संशोधन वर्णनात्मक अभ्यास आहे. विविध वेबसाइट्सवरून आवश्यक दुय्यम डेटा गोळा केला गेला ज्यात नंतर विश्लेषण आणि निष्कर्षापर्यंत पोहोचण्यासाठी पुनरावलोकन केले गेले.

**अमरावती जिल्हयातील 'प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना वर्षनिहाय शेतकरी लाभार्थी संख्यास व रक्कम (लाखात )**

**कोष्टक क्र. १**

| वर्ष | लाभार्थी संख्या | रक्कम (लाखात ) |
|---|---|---|
| २०१५-१६ | ४०७२ | ८८५.९६ |
| २०१६-१७ | १३९९ | २९७.८० |
| २०१७-१८ | १२२४३ | २०५८.६ |
| २०१८-१९ | ६१०९ | १००४.५५ |
| २०१९-२० | ६११३. | १०३९.०२ |

**आलेख क्र. १**




५

. **निष्कर्ष :**

I. अमरावती जिल्ह्यातील प्रधानमंत्री कृषी योजना महाराष्ट्र या योजनेचा अमरावती जिल्ह्यातील वर्ष २०१५-१६ मध्ये ४०७२ लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला व सरकारने ८८५.९६ रुपये (लाखात) एवढा खर्च त्या योजनेवर केला असे दिसून येते.

II. या योजनेचा अमरावती जिल्ह्यातील वर्ष २०१६-१७ मध्ये १३९९ लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला व सरकारने २९७.८० रुपये (लाखात) एवढा खर्च त्या योजनेवर केला, गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी लाभार्थ्यांची संख्या मध्ये घसरण झालेली दिसून येते.

III. या योजनेचा अमरावती जिल्ह्यातील वर्ष २०१७-१८ मध्ये १२२४३ लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला व सरकारने २०५८.६ रुपये (लाखात) एवढा खर्च त्या योजनेवर केला, गेल्या दोन वर्षीच्या तुलनेत यावर्षी

लाभार्थ्यांची संख्या मध्ये वाढलेली झालेली दिसून येते.

IV. या योजनेचा अमरावती जिल्ह्यातील वर्ष २०१८-१९ व २०१९-२० मध्ये अनुक्रमे ६१०९ व ६०१३ लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला व सरकारने अनुक्रमे १००४.५५ व १०३९.०२रुपये (लाखात) एवढा खर्च त्या योजनेवर केला, या दोन वर्षात लाभार्थ्यांची संख्या मध्ये वाढ झालेली दिसून येते नाही.

v. यावरून असे लक्षात येते की, सरकार आपल्या योजनेमार्फत शेतकऱ्यांना लाभ देण्यासाठी प्रयत्नशील आहे. परंतु योजनेचा लाभ सर्व शेतकऱ्यांना मिळत नाही. यासाठी मोठ्या प्रमाणात सरकारला त्यांच्या योजनांमध्ये बदल करून जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत योजनेचा लाभ किंवा माहिती पोहोचविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

## ६. संदर्भ ग्रंथसूची :

१. रा.णा. घाटोळे समाजशास्त्रातील संशोधन तत्त्वे पद्धती, मंगेश प्रकाशन, नागपूर.

२. कराड बी. एम.( जानेवारी 2007) शास्त्रीय संशोधन पद्धती पिंपळपुरे अँड कोठारी पब्लिकेशन, नवी दिल्ली.

३. प्रतियोगिता दर्पण (आवर्ती 2018) भारतीय अर्थव्यवस्था

४. शिंदे जगन्नाथ (2012 -13) अर्थ सहाय्य योजना गोदावरी पब्लिकेशन, नाशिक.

५. विनायक चांदगुडे (जुलै 2017) अद्यावत शासकीय विकास योजना चा खजिना सकाळ पेपर्स प्रा. लिमिटेड

**वर्तमान पत्रे :**

१. अग्रोवन

२.तरुण भारत

३.लोकसत्ता

**मासिक :**

१. शेतकरी शेतकऱ्यांच्या सेवार्थ कृषी विभाग महाराष्ट्र राज्य

कृषि संचालक कार्यालय, अमरावती.